**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार  दिनांक ३१ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

**1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'परीक्षा पे चर्चा' या उपक्रमाने ओलांडला ऐतिहासिक टप्पा**

**2. अमरावतीच्या अंबादेवी संस्थानास चिखलदरा इथल्या  महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची तीन एकर जमीन देण्यास मंत्रिमंडळाची मान्यता**

**3. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांच्या प्रचार खर्चासंदर्भात महत्त्वाचे बदल  केले जाहीर**

**4. नागपूरचे प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचं निधन, सर्व स्तरातून शोक व्यक्त**

---------------------------------------------

**'परीक्षा पे चर्चा'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारने सुरु झालेल्या महत्त्वाकांक्षी 'परीक्षा पे चर्चा' या उपक्रमानं ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. कालपर्यंत या उपक्रमात सहभागासाठी तीन कोटींहून अधिक नोंदणी झाली आहे. देशभरातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी यात प्रचंड सहभाग दर्शवला आहे, जो या कार्यक्रमाची वाढती लोकप्रियता दर्शवतो. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करतो आणि परीक्षांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन वाढवतो, असं शिक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

---------------------------------------------

**दिनदर्शिकेचं  प्रकाशन**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांच्या हस्ते केंद्र सरकारच्या अधिकृत दिनदर्शिकेचं आज दिल्ली इथं प्रकाशन करण्यात आलं. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांची यावेळी उपस्थिती होती. सरकारनं केलेल्या ऐतिहासिक सुधारणा या दिनदर्शिकेतून प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

---------------------------------------------

**अमरावती  अंबादेवी संस्थान**

अमरावती जिल्ह्यातील मौजे चिखलदरा येथील अंबादेवी संस्थान, अमरावती यांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची ३ एकर जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.चिखलदरा येथील सुमारे साडे सात एकर जमीन १९७५ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी देण्यात आली होती. पण ही जमीन वापराविना पडून होती. दरम्यान, अमरावतीच्या श्री अंबादेवी संस्थानाकडे  यांनी चिखलदरा येथील देवी पॉईंट आणि विराट देवी देवस्थान यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या संस्थानाने या दोन्ही देवस्थानच्या विकासासाठी शासनाकडे जमिनीची मागणी केली आहे. त्यानुसार पर्यटन विकास महामंडळाकडील सुमारे तीन एकर जमीन शासन जमा करून घेऊन, ती श्री. अंबादेवी संस्थानास विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ही जमीन मंदिर संस्थानाला भोगवटादार वर्ग - २ म्हणून मिळणार असून, ही जमीन केवळ धार्मिक प्रयोजनासाठी वापरता येणार आहे.

---------------------------------------------

**सदानंद वसंत दाते**

महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक  पदावर आयपीएस अधिकारी सदानंद वसंत दाते यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा कार्यकाळ नियुक्तीच्या तारखेपासून पुढील दोन वर्षांचा असेल. विद्यमान पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांचाकार्यकाळ ३ जानेवारी २०२६ रोजी संपुष्टात येत आहे. हा निर्णय संघ लोकसेवा आयोगाच्या शिफारशी व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घेण्यात आल्याचे गृह विभागाने स्पष्ट केले आहे.

---------------------------------------------

**जागतिक उत्पादनशक्ती**

वर्ष 2025 मध्ये भारत जागतिक उत्पादनशक्ती म्हणून उदयास आला,या विषयी सारांश स्वरूपातील अहवाल आमच्या प्रतिनिधी कडून

*(व्हॉइस कास्ट - हेमांगी कुलकर्णी)*

*2025 मध्ये भारताने केवळ वेगाने वाढणारी बाजारपेठ न राहता जागतिक उत्पादन केंद्र म्हणून स्वतःची ठाम ओळख निर्माण केली. उत्पादन, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक सुधारणांच्या जोरावर भारताचा विकासदर 7.8% पर्यंत पोहोचला. इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, मोबा�ल, सौरऊर्जा, दूरसंचार आणि संरक्षण क्षेत्रात मोठी झेप घेत*

*भारताने जागतिक पुरवठा साखळीत महत्त्वाची भूमिका बजावली. 'मेड इन इंडिया' मोबा�ल उत्पादन 99% पर्यंत पोहोचले असून भारत जगातील दुसरा मोठा मोबा�ल उत्पादक ठरला. खासगी क्षेत्रातील गुंतवणूक, एफडीआय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारताकडे कल वाढला आहे. या औद्योगिक प्रगतीमुळे लाखो रोजगार निर्माण झाले असून युवकांना उच्च-मूल्य उद्योगांमध्ये संधी मिळाल्या आहेत. 2025 हे वर्ष भारतासाठी "संभावनेतून सामर्थ्याकडे" झालेल्या संक्रमणाचे प्रतीक ठरले असून भारत आता जगासाठी उत्पादन करणारा देश बनला आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी नागपूरहून मी हेमांगी कुलकर्णी*

---

**साहित्य महामंडळ**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उद्या पासून ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान साताऱ्यातील शाहू स्टेडियम इथं होणार असून तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती स्वागताध्यक्ष आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली. साताऱ्याच्या ऐतिहासिक वारशाला साजेसे भव्य व यशस्वी संमेलन हो�ल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

---

**प्रचार खर्च**

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांच्या प्रचार खर्चासंदर्भात महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. खर्चाची मर्यादा वाढवली असली तरी त्यावर कडक नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार उमेदवारांनी केलेल्या प्रत्येक प्रचार सभा, मेळावा आणि कार्यक्रमाचे छायाचित्र, खर्चाचा तपशील, खर्चाची अधिकृत बिलं जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. रोख खर्चावर मर्यादा ठेवत बँक व्यवहार आणि खर्चाचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे.मनपा निवडणुकांसाठी उमेदवारांच्या प्रचार खर्चाची कमाल मर्यादा मनपाच्या वर्गवारीनुसार निश्चित केली आहे. त्यानुसार अ वर्ग मनपासाठी १५ लाख रुपये, ब वर्गासाठी १३ लाख रुपये, क वर्गासाठी ११ लाख रुपये तर ड वर्ग मनपेसाठी ९ लाख रुपयांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

---

**अर्जांची आज छाननी**

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी दाखल उमेदवारी अर्जांची आज छाननी होत आहे. अनेक ठिकाणी युती आणि आघाडीचा निर्णय होऊन, काल उमेदवारी

अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी उमेदवार जाहीर झाले. त्यामुळे अर्ज दाखल करण्यासाठी सगळीकडेच मोठी गर्दी पाहायला मिळाली.आज छाननी झाल्यानंतर दोन जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील, तीन जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप हो�ल, आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध हो�ल. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे.अमरावती महापालिका निवडणुकीसाठी ८७ जागांसाठी एकूण १०२१ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले असून सातही झोनमध्ये नामांकनाच्या शेवटच्या दिवशी काल मोठी गर्दी उसळली होती.

---

**विजय वडेट्टीवार**

नागपूर महानगरपालिकेतील आघाडी तुटण्यास राष्ट्रवादीकडून झालेल्या अवाजवी जागावाटपाच्या मागण्या कारणीभूत ठरल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. आमच्या मजबूत जागांवर दावा करण्यात आल्याने तडजोड शक्य नव्हती, असे ते म्हणाले. मुंब�तील वंचितच्या 16 जागांबाबत कमी वेळेत उमेदवार न मिळाल्याने आघाडी कार्यकर्त्यांमध्ये चुकीचा संदेश गेला, असेही त्यांनी स्पष्ट केले. सत्ताधाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव असून सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी दिसत असल्याचा टोला वडेट्टीवार यांनी लगावला.

---

**न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे**

नागपूरमधील सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचं ५७ व्या वर्षी निधन झालं. वैद्यकीय क्षेत्रातून त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त होत आहे दरम्यान, २५ वर्षांहून अधिक काळ दिलेल्या आपल्या वैद्यकीय सेवेत डॉ. पाखमोडे यांनी असंख्य रुग्णांना नवजीवन दिले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, अश्या भावना रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या शोकसंदेशातून व्यक्त केल्या आहेत. डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत धक्कादायक व दुःखद असल्याची भावना राज्याचे महसूलमंत्री आणि नागपूर , अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली आहे.

---

**हवामान**

विदर्भात आज गोंदिया इथं ८ पूर्णांक २ अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली तर अमरावती इथं कमाल तापमान ३१ पूर्णांक

८  अंश सेल्सिअस इतके होते नागपुरात ८ पूर्णांक ५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

---------------------------------------------

**शेगाव गर्दी**

नववर्षाच्या स्वागतासह संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी संतनगरी शेगाव येथे मोठ्या प्रमाणात भक्तांची गर्दी होत आहे. राज्य शासनाने विविध कार्यक्रमांना पहाटे ५ वाजेपर्यंत परवानगी दिल्याने ३१ डिसेंबर रोजी रात्रभर भक्त शेगावात दाखल होताना दिसत आहेत. भक्तांच्या सोयीसाठी संत गजानन महाराजांचे मंदिर आज ३१ डिसेंबर रोजी रात्रभर खुले राहणार असून समाधी दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच आनंद विहार, आनंद विसावा आदी भक्तनिवासांमध्ये राहण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून प्रशासनाने आवश्यक सुविधा सज्ज ठेवल्या आहेत.

---------------------------------------------